# पुणे जिल्हा शिक्षण मंडळ

## मामासाहेब मोहोळ महाविद्यालय,पौड रोड,पुणे-३८

## सांस्कृतिक विभाग अहवाल

## शैक्षणिक वर्ष:- जुलै 2024- सप्टेंबर 2024

**20 जुलै 2024 सायकल रॅलीचे स्वागत:**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या मामासाहेब महाविद्यालया च्या सांस्कृतिक विभागामार्फत दिनांक 20 जुलै रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळ आयोजित सायकल रॅलीचे स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली ढोल लेझीम आणि झांझांच्या गजरात मामलेदार कचेरी चौक शुक्रवार पेठ येथे करण्यात आले. या संपूर्ण स्वागत समारंभाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. शोभा तितर आणि डॉ. रूपाली शेंडकर यांनी केले महाविद्यालयातील वरिष्ठ कनिष्ठ विभागाचे प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी आपला सहभाग नोंदविला स्वागत रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी पर्यावरण आणि जागृतीसाठी फलक प्रदर्शन केले त्याचबरोबर सायकल स्वारांचे स्वागत गुलाबाच्या फुलांच्या पाकळ्या उधळून केले.

**22 जुलै 2024 रांगोळी स्पर्धा:**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष माननीय अजित दादा पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात दिनांक 22 जुलै रोजी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागाच्या वतीने रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले यामध्ये वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सामाजिक आणि पर्यावरणाच्या विषयावर उत्कृष्ट रांगोळ्या काढल्या यामध्ये एकूण 49 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला या स्पर्धेच्या उद्घाटनासाठी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष माननीय राजेंद्र घाडगे साहेब यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात करणे आवश्यक आहे असे त्यांनी आपले मत नोंदविले.

स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे. **प्रथम क्रमांक विभागून** मयुरी पांचाळ T Y Bsc(comp.sci.) प्रचिती पंडित T Bsc(comp.sci.) **द्वितीय क्रमांक विभागून** संपदा चोरघडे FY BSC मृदुला पवळे TY B COM **तृतीय क्रमांक** अंकिता सरदार FY BSC रांगोळीस्पर्धेचे परीक्षण डॉ. शोभा तितर यांनी केले महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख डॉ. शोभा तितर आणि समन्वयक डॉ. रूपाली शेंडकर आणि प्रा. वैशाली कदम यांनी रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले.

**रांगोळी स्पर्धांचे परीक्षण करताना उपाध्यक्ष श्री राजेंद्र घाडगे साहेब**




**1 ऑगस्ट 2024 शाहीर अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी:**

दिनांक 1 ऑगस्ट 2024 रोजी मामासाहेब मोहोळ महाविद्यालय येथे सांस्कृतिक विभागाच्या वतीने शाहीर अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले महाविद्यालयातील प्राध्यापकांनी या दोन महान व्यक्तींच्या कार्य कर्तृत्वाचा आढावा या निमित्ताने घेतला यामध्ये प्राध्यापक कीर्ती करंजावणे प्राध्यापक सीमा कांबळे प्राध्यापक लक्ष्मण उकिरडे महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉक्टर शर्मिला चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.रूपाली शेंडकर यांनी केले.

**9 ऑगस्ट 2024: नागपंचमीचे पारंपारिक खेळ व मेहंदी स्पर्धा**

मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात दिनांक 9 ऑगस्ट 2024 रोजी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागा मार्फत नागपंचमीचे पारंपारिक खेळ व मेहंदी स्पर्धा आयोजित करण्यात आली यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनींना सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रूपाली शेंडकर यांनी नागपंचमीला खेळल्या जाणाऱ्या खेळाचे शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या महत्त्व व मिळणारे फायदे याबाबत सखोल मार्गदर्शन केले त्याचबरोबर विद्यार्थीनी आणि महाविद्यालयातील महिला प्राध्यापक यांनी मिळून नागपंचमीचे पारंपारिक खेळ खेळून कार्यक्रमात सहभाग नोंदविला

मेहंदी स्पर्धेमध्ये एकुण 20 विद्यार्थिनी सहभागी झाल्या स्पर्धेसाठी विद्यार्थिनींना 30 मिनिटाची वेळ दिलेली होती या वेळात विद्यार्थिनींनी अत्यंत सुबक मेहंदी काढली आणि स्पर्धेत उस्फुर्त सहभाग घेतला.

**पुणे जिल्हा शिक्षण मंडळ**

**मामासाहेब मोहोळ महाविद्यालय,पौड रोड,पुणे-३८**

**सांस्कृतिक विभाग अहवाल**

**शैक्षणिक वर्ष:- जुलै 2024- सप्टेंबर 2024**

**20 जुलै 2024 सायकल रॅलीचे स्वागत:**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या मामासाहेब महाविद्यालया च्या सांस्कृतिक विभागामार्फत दिनांक 20 जुलै रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळ आयोजित सायकल रॅलीचे स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली ढोल लेझीम आणि झांझांच्या गजरात मामलेदार कचेरी चौक शुक्रवार पेठ येथे करण्यात आले. या संपूर्ण स्वागत समारंभाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. शोभा तितर आणि डॉ. रूपाली शेंडकर यांनी केले महाविद्यालयातील वरिष्ठ कनिष्ठ विभागाचे प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी आपला सहभाग नोंदविला स्वागत रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी पर्यावरण आणि जागृतीसाठी फलक प्रदर्शन केले त्याचबरोबर सायकल स्वारांचे स्वागत गुलाबाच्या फुलांच्या पाकळ्या उधळून केले.

**22 जुलै 2024 रांगोळी स्पर्धा:**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष माननीय अजित दादा पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात दिनांक 22 जुलै रोजी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागाच्या वतीने रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले यामध्ये वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सामाजिक आणि पर्यावरणाच्या विषयावर उत्कृष्ट रांगोळ्या काढल्या यामध्ये एकूण 49 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला या स्पर्धेच्या उद्घाटनासाठी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष माननीय राजेंद्र घाडगे साहेब यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात करणे आवश्यक आहे असे त्यांनी आपले मत नोंदविले.

स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे. **प्रथम क्रमांक विभागून** मयुरी पांचाळ T Y Bsc(comp.sci.) प्रचिती पंडित T Bsc(comp.sci.) **द्वितीय क्रमांक विभागून** संपदा चोरघडे FY BSC मृदुला पवळे TY B COM **तृतीय क्रमांक** अंकिता सरदार FY BSC

रांगोळीस्पर्धेचे परीक्षण डॉ. शोभा तितर यांनी केले महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख डॉ. शोभा तितर आणि समन्वयक डॉ. रूपाली शेंडकर आणि प्रा. वैशाली कदम यांनी रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले.

**रांगोळी स्पर्धांचे परीक्षण करताना उपाध्यक्ष श्री राजेंद्र घाडगे साहेब**




**1 ऑगस्ट 2024 शाहीर अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी:**

दिनांक 1 ऑगस्ट 2024 रोजी मामासाहेब मोहोळ महाविद्यालय येथे सांस्कृतिक विभागाच्या वतीने शाहीर अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले महाविद्यालयातील प्राध्यापकांनी या दोन महान व्यक्तींच्या कार्य कर्तृत्वाचा आढावा या निमित्ताने घेतला यामध्ये प्राध्यापक कीर्ती करंजावणे प्राध्यापक सीमा कांबळे प्राध्यापक लक्ष्मण उकिरडे महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉक्टर शर्मिला चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.रूपाली शेंडकर यांनी केले.

**9 ऑगस्ट 2024: नागपंचमीचे पारंपारिक खेळ व मेहंदी स्पर्धा**

मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात दिनांक 9 ऑगस्ट 2024 रोजी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागा मार्फत नागपंचमीचे पारंपारिक खेळ व मेहंदी स्पर्धा आयोजित करण्यात आली यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनींना सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रूपाली शेंडकर यांनी नागपंचमीला खेळल्या जाणाऱ्या खेळाचे शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या महत्त्व व मिळणारे फायदे याबाबत सखोल मार्गदर्शन केले त्याचबरोबर विद्यार्थीनी आणि महाविद्यालयातील महिला प्राध्यापक यांनी मिळून नागपंचमीचे पारंपारिक खेळ खेळून कार्यक्रमात सहभाग नोंदविला

मेहंदी स्पर्धेमध्ये एकुण 20 विद्यार्थिनी सहभागी झाल्या स्पर्धेसाठी विद्यार्थिनींना 30 मिनिटाची वेळ दिलेली होती या वेळात विद्यार्थिनींनी अत्यंत सुबक मेहंदी काढली आणि स्पर्धेत उस्फुर्त सहभाग घेतला.

मेहंदी स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे. प्रथम क्रमांक विभागून वारे वैष्णवी S Y Bsc(comp.sci.) आणि नेहा चौधरी F. Y B COM द्वितीय क्रमांक विभागून स्वाती ननावरे FY BSC आणि हर्षदा उभे SY BBA तृतीय क्रमांक विभागून हर्षदा जोरी TY B COM साक्षी कदम SY B COM मेहंदी स्पर्धेचे परीक्षण डॉ. शोभा तितर यांनी केले या संपूर्ण कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ मेघना भोसले, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ सुनिता डाकले, इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या प्रमुख डॉ. सपना राणे आणि सर्व महिला प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन सांस्कृतिक विभागाच्या समिती सदस्यांनी केले.

**19 ऑगस्ट 2024: दिव्यांग मुलांच्या बरोबर रक्षाबंधन**

सोमवार दिनांक 19 ऑगस्ट 2024 रोजी मामासाहेब मोहोळ महाविद्यालय पौड रोड येथील राष्ट्रीय सेवा योजना आणि सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग मुलांच्या बरोबर रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थिनी आणि विद्यार्थी व प्राध्यापक वृंदाने कोरेगाव पार्क येथील मुलांच्या अंधशाळेला भेट दिली.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बरोबर संवाद साधला त्यांच्यामार्फत राबवल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांची माहिती घेतली आणि रक्षाबंधन सण साजरा केला या उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ मेघना भोसले, डॉ सुनिता डाकले, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ श्रीनिवास इपलपल्ली, डॉ अशोक शेळके, प्रा लक्ष्मण ऊकिरडे, डॉ रुपाली शेंडकर, प्रा स्नेहा हिंगमिरे, प्रा सीमा कांबळे, प्रा मनीषा खंडाळे, प्रा नीलम ढगारे यांनी आपला सहभाग नोंदवला.

**26 ऑगस्ट 2024: 'पुस्तक हंडी'**

मंगळवार दिनांक 26 ऑगस्ट 2024 रोजी मामासाहेब मोहोळ महाविद्यालय पौड रोड पुणे या ठिकाणी माननीय प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यामार्फत 'पुस्तक हंडीचे' आयोजन करण्यात आले.

या पुस्तकहंडीचे आयोजन करण्यामागे विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमा व्यतिरिक्त इतर विषयांची पुस्तके हाताळावी, त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या मध्ये वाचन संस्कृती रुजावी हा प्रमुख उद्देश डोळ्यासमोर ठेवून आयोजन करण्यात आले. या पुस्तक हंडी उत्सवामध्ये विद्यार्थ्यांनी ढोल ताशाच्या गजरात पारंपारिक गाण्यांवर नृत्य केले या उपक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपला सहभाग नोंदविला

**29 ऑगस्ट 2024: मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त शारीरिक सुदृढता तपासणी शिबिर**

29 ऑगस्ट 2024 रोजी मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात भारताचे सुप्रसिद्ध हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त शारीरिक सुदृढता तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्दिष्ट विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढविणे तसेच शारीरिक सुदृढतेचे महत्त्व अधोरेखित करणे होते.

शिबिरामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. शारीरिक तपासणीमध्ये रक्तदाब, हृदयाचे. दर, शरीरातील मेदाचे प्रमाण, दोन्ही हातातील स्नायूंची ताकद, वजन, उंची, तपासणी करण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर शर्मिला चौधरी यांनी या उपक्रमाचे कौतुक करत म्हटले की, "शिक्षक व विद्यार्थ्यांचे शारीरिक आरोग्य टिकवणे हे त्याच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्त्वाचे आहे. अशा शिबिरामुळे विद्यार्थी आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आपले आरोग्य नीट राखू शकतील आणि भविष्यात अधिक जबाबदारीने आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब करतील"

या शिबिराचे आयोजन महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आणि सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले होते. मेजर ध्यानचंद यांच्या कार्याचे स्मरण करून, विद्यार्थ्यांनी त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल अभिमान व्यक्त केला. सदर कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते

**2 सप्टेंबर 2024: "पर्यावरण पूरक गणेश मूर्ती निर्माण"कार्यशाळा**

मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात सोमवार दिनांक 2 सप्टेंबर 2024 रोजी प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "पर्यावरण पूरक गणेश मूर्ती निर्माण" कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेसाठी प्रसिद्ध मूर्तिकार गणेश कापसे यांना आमंत्रित करण्यात आले. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रूपाली शेंडकर यांनी पर्यावरण पूरक गणेशोत्सव कशा पद्धतीने साजरा करता येऊ शकतो याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले डॉ. स्वाती शिंदे यांनी गणेश कापसे यांचा विद्यार्थ्यांना परिचय दिला. महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. मेघना भोसले व वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुनीता डाकले यांच्या हस्ते गणेश कापसे यांचा सत्कार करण्यात आला गणेश कापसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नवनिर्मिती, सृजनशीलता याचा आनंद घ्या मनापासून माती काम करा उत्तम प्रतिकृती निर्माण करते असा विश्वास विद्यार्थ्यांच्या मनामध्ये निर्माण केला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेस उत्तम प्रतिसाद देऊन विविध गणेश मूर्ती तयार केल्या

या कार्यशाळेचे संयोजन डॉ अशोक शेळके, प्रा.स्नेहा हिंगमिरे प्रा.सीमा कांबळे प्रा.मोहिनी कुंभार प्रा.शितल गायकवाड यांनी केले तसेच प्रा. लक्ष्मण उकिर्डे यांनी आभार मानले. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपला उस्फूर्त सहभाग नोंदवला.

**विद्यार्थ्यांनी केलेल्या गणेश मूर्तींची पाहणी करताना महाविद्यालयाच्या**

**प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी**



**5 सप्टेंबर 2024: शिक्षक दिन**

गुरुवार दिनांक 5 सप्टेंबर 2024 रोजी मामासाहेब मोहोळ महाविद्यालयातील सांस्कृतिक व विभागामार्फत शिक्षक दिन आणि डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी करण्यात आली.

महाविद्यालयातील 66 विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून विद्यार्थ्यांना शिकविले. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती मनोगत व्यक्त केले. शिक्षक दिनानिमित्त सांस्कृतिक विभागामार्फत शिक्षकांचा गौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता. या गौरव समारंभामध्ये अनेक शिक्षकांनी शिक्षक दिना प्रति आपले मनोगत व्यक्त केले तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांनी सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच शिक्षकांचे समाजातील स्थान तसेच त्यांच्या जबाबदाऱ्या बद्दल देखील मार्गदर्शन केले. स्टेट बँक ऑफ इंडिया पौड रोड शाखा यांच्यावतीने बँकेचे व्यवस्थापक राधिका आणि गायत्री यांच्या वतीने महाविद्यालयातील शिक्षकांचा शुभेच्छा पत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मण उकिर्डे यांनी केले तसेच प्रास्ताविक संस्कृती विभाग प्रमुख डॉ. रूपाली शेंडकर यांनी केले.

**9 सप्टेंबर 2024: पुणे जिल्हा शिक्षण मंडळवर्धापन दिन**

सोमवार दिनांक 9 सप्टेंबर 2024 रोजी मामासाहेब मोहोळ महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागा मार्फत संस्था वर्धापन दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे संस्थापक शिक्षण महर्षी स्वर्गीय बाबुरावजी घोलप साहेब यांनी 7 सप्टेंबर 1941रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाची स्थापना केली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना

बाबुरावजी घोलप साहेबांची तसेच संस्थे बद्दलची माहिती व्हावी यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रूपाली शेंडकर यांनी केले उपप्राचार्य डॉ. मेघना भोसले यांनी संस्थेच्या स्थापने ची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच ज्येष्ठ प्राध्यापक लक्ष्मण उकिरडे सर यांनी संस्थेबद्दलचा इतिहास विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. डॉ.आदिनाथ पाठक यांनी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाची सद्यस्थिती बाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली.

कार्यालयीन अधीक्षक विनोद रणपिसे यांनी या संस्थेतून मिळणारा रोजगार व त्याबाबत मिळणारे समाधान याबाबत आपले मत मांडले . प्राचार्य डॉ शर्मिला चौधरी यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' ब्रीद वाक्य प्रमाणे संस्थेची वाटचाल समजावून सांगितली.

गणेशोत्सवानिमित्त महाविद्यालयातील प्राध्यापिका राधिका इप्पकायल यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण केले. महाविद्यालयातील जिमखाना विभाग प्रमुख डॉ. योगेश पवार त्याचबरोबर कनिष्ठ विभागाचे शारीरिक शिक्षण प्रमुख प्रा. सातव यांनी देखील संस्था वर्धापन दिनानिमित्त टीम बिल्डिंगचे विविध खेळ आयोजित केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी या खेळांमध्ये सहभागी झाले. तसेच कार्यक्रमाचे आभार डॉ. प्रकाश हुंबाड यांनी मानले.

डॉ.रुपाली शेंडकर यांनी सप्टेंबर २०२४ पर्यंत सांस्कृतिक विभाग समन्वयक म्हणून काम पाहिले व सर्व कार्यक्रमांचे नियोजन केले .१ ऑक्टोबर २०२४ पासून प्रा.अपर्णा पांडे यांनी सांस्कृतिक विभागप्रमुख म्हणून काम पाहिले.

10 ऑक्टोबर २०२४ संस्कृति जतन ते स्वसंरक्षण कार्यशाळा
या कार्यक्रमात महाराष्ट्र जुडो चंपिअरशिप स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त जान्हवी जाधव ,वैष्णवी शेंडगे ,देवकी मानकर यांनी कराटे प्रात्यक्षिक दाखविली . पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे क्रीडा प्रमुख श्री शाम भोसले तसेच महाविद्यालातील क्रीडा प्रमुख डॉ.योगेश पवार यांनी स्वसंरक्षण संदर्भात मार्गदर्शन केले .याप्रसंगी भोंडला आयोजन करण्यात आले होते .यामध्ये विद्यार्थिनी अध्यापिका ,शिक्षकेतर कर्मचारी,महिला ऑफिस स्टाफ उपस्थित होते .

15 ऑक्टोबर २०२४ – वाचन प्रेरणा दिवस
मराठी विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरी करण्यात आली .याप्रसंगी सामुहिक वाचन घेण्यात आले .यामध्ये विद्यार्थी व प्राध्यापकांनी आपल्या आवडीच्या पुस्तकाचे वाचन केले .

11 डिसेंबर २०२४ – शांतता पुणेकर वाचत आहे .

मराठी विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पुस्तक न्यास यांच्या वतीने आयोजित पुस्तक महोत्सवाअंतर्गत शांतता पुणेकर वाचत आहे हा कार्यक्रम घेण्यात आला .यामध्ये विद्यार्थी व प्राध्यापकांनी सलग एक तास वाचन केले .महाविद्यालयाच्य ग्रंथालयाच्या वतीने विविध साहित्य प्रकारातील पुस्तके ठेवण्यात आली होती .

20 डिसेंबर २०२४ ख्रिसमस पार्टी

महाविद्यालयातील प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी ,ऑफिस स्टाफ यांच्या साठी विविध संस्कृति विषयी देवाण घेवाण व्हावी या उद्देश्याने ख्रिसमस पार्टीचे आयोजन करण्यात आले होते .सर्वांनी यामध्ये उत्साहात सहभाग घेतला .

3 जानेवारी २०२५ सावित्रीबाई फुले जयंती

महाविद्यालात 3 जानेवारी २०२५ सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली . सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली .व महाविद्यालयातील प्राध्यापकानी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला .

१ फेब्रुवारी २०२५ बाबुरावजी घोलप जयंती

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे संस्थापक कैं. बाबुरावजी घोलप यांच्या जयंती निमित्त सांस्कृतिक विभाग व वुमेन सेल यांच्या संयुक्त विद्यमाने तीळ गुळ समारंभाचे आयोजन करण्यात आले होते .याप्रसंगी महिलांसाठी मनोरंजना बरोबर ज्ञान मिळावे या उद्देश्याने विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते .

५ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी २०२५ विविध डेज आणि स्पर्धा

सांस्कृतिक विभागा च्या वतीने ५ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी २०२५ विविध डेज आणि स्पर्धा चे आयोजन करण्यात आले यामध्ये

५ फेब्रुवारी मामासाहेब मोहोळ जयंती निमित्त पाककृती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते . व याच दिवशी ब्लयक अंड व्हाईट डे साजरा करण्यात आला . पाककृती स्पर्धेमध्ये प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले .प्रथम क्रमांक सुजल घोडके (द्वितीय वर्ष वाणिज्य ) , द्वितीय क्रमांक रीषिक हिरीनाईक (एफ.वाय.बी.वोक),तृतीय क्रमांक सुमित चव्हाण (एस.वाय.बी.एसी ) काढण्यात आले .

६ फेब्रुवारी रोजी फोर्मल डे व सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली . प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले .प्रथम क्रमांक ज्ञानेश्वरी सणस (द्वितीय वर्ष वाणिज्य ) , द्वितीय क्रमांक दीप दळवी (द्वितीय वर्ष वाणिज्य),तृतीय क्रमांक वैष्णवी वारे (एस.वाय.बी.एसी सी .एस ) काढण्यात आले .

७ फेब्रुवारी रोजी मिस मच डे व मेंदी स्पर्धा घेण्यात आली . प्रथम क्रमांक हर्षदा जोरी (तृतीय वर्ष वाणिज्य ) , द्वितीय क्रमांक वैष्णवी वारे (द्वितीय वर्ष संगणक ),तृतीय क्रमांक ऐश्वर्या सोनावणे (प्रथम वर्ष वाणिज्य) काढण्यात आले .

८ फेब्रुवारी रोजी पारंपारिक वेश भूषा दिवस आयोजित करण्यात आला व नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले . . प्रथम क्रमांक अथर्व काटे व ग्रुप (तृतीय वर्ष विज्ञान ) , द्वितीय क्रमांक आर्या जेटके व ग्रुप (द्वितीय वर्ष संगणक ),तृतीय क्रमांक निकिता सिद्धगणेश व ग्रुप काढण्यात आले.

मा.प्राचार्य डॉ.शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य डॉ.मेघना भोसले व सांस्कृतिक विभागातील सर्व सदस्य डॉ.रुपाली शेंडकर ,प्रा.लक्ष्मण उकिरडे ,प्रा.अर्चना ढोबळे ,प्रा.स्नेहा हिंगमिरे ,प्रा.कीर्ती करंजावणे,प्रा.नीलम ढगारे ,प्रा.शीतल गायकवाड ,प्रा.मोहिनी कुंभार ,प्रा.दिपाली फड याच बरोबर वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.सुनिता डाकले I.Q.S.C.समन्वयक डॉ.सपना राणे ,प्रा.सीमा कांबळे ,प्रा.मनीषा खंडाळे,प्रा.कुमुदिनी पाटील,प्रा.परोपते ,प्रा .प्रतीक्षा चव्हाण यांचे मोलाचे सहकार्य लाभले .

प्रा.अपर्णा पांडे
सांस्कृतिक विभागप्रमुख

डॉ.शर्मिला चौधरी
प्राचार्य

प्राचार्य
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय
पौड रोड, पुणे-४११०३८.